# लोकसाहित्य संशोधन : एक उलटतपासणी

अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - मराठी संशोधन पत्रिका, मुंबई, संपा. रमेश तेंडुलकर, ऑक्टो-नोव्हें-डिसें १९८२)

कमी अधिक कसदारपणे लोकसाहित्याच्या विविध अंगांचा अभ्यास महाराष्ट्रात बराच काळ होत आला आहे असे ढोबळ मानाने म्हणता येईल. लोकसाहित्याचे असे एक सुघटित शास्त्र अजूनही बनलेले नाही. तेव्हा असे होणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. सुबद्ध नसलेल्या शास्त्राकडे अभ्यासक अधिक संख्येने आकर्षित होत असतात! कारण ठामपणे मांडलेल्या मतांचे अडसर किंवा मजबूतपणे रूढ झालेल्या अभ्यासपद्धतींचे कडीकोयंडे अशा शास्त्रात कमी असतात आणि त्या कारणाने ये-जा करण्यास बरीच मोकळीक असते. प्रकाशित होत असलेले लेख, तयार होत असणारे शोधप्रबंध, वाचले जाणारे शोधनिबंध किंवा सादर केले जाणारे शोधप्रकल्प इ. बाबींमधून लोकसाहित्याच्या अभ्यासकांना या शास्त्रांत बरीच मोकळीक असल्याचा सुगावा लागल्याची चिन्हे दिसतात! आपल्याला जाणवणारे हे बाळसे फसवे ठरू नये म्हणून काही प्रश्न विचारण्याची वेळ आताच साधावी असे वाटल्याने हा प्रपंच करीत आहे.

पाहिली बाब अशी की आमच्या अध्ययनात आजही एक निर्णय वा निष्कर्षहीनता दिसते. म्हणजे असे की कोणता तपशील महत्त्वाचा आणि का याचा खोलवरचा विचार न करता सर्व हुडकलेला तपशील केवळ हुडकून काढल्यामुळे अर्थपूर्ण मानण्याकडे प्रवृत्ती दिसते. कोणताही तपशील असो तो अर्थपूर्ण आहे हे सिद्ध करावे लागते. अर्थपूर्णता ही गृहीत धरण्याची गोष्ट नव्हे. तपशील आणि तथ्य या गोष्टींना काही अंगभूत मूल्य जरूर असते. पण त्यांची अर्थपूर्णता मात्र अधिक मोठ्या चौकटीच्या अस्तित्वावर अवलंबून असते. ही चौकट औपपत्तिक विचाराची असते आणि आमच्या लोकसाहित्याच्या अभ्यासकांच्या विवरणात या चौकटीचे अस्तित्व जाणवत नाही. तथ्ये वा घटिते यांचा वेध घेतल्याने शोधन होऊ शकते. संशोधन नव्हे! अनेकदा या प्रकारच्या आक्षेपास उत्तर म्हणून मांडली गेलेली भूमिका इथेच विचारात घेतलेली बरी. 'प्रथम तथ्ये गोळा करू द्या. त्याशिवाय उपपत्ती कशी संभवते?' असे म्हटले जाते. हा युक्तिवाद फसवा आहे. उपपत्तीचे पूर्वरूप उमगणे व तथ्यांचे संकलन करणे या गोष्टी एकदम होत असतात. पुरेशा तथ्यांच्या संकलनानंतर मग उपपत्ती तयार होत नसते - कारण उपपत्तीनिरपेक्ष तथ्ये जवळजवळ नसतात, निदान लोकसाहित्यशास्त्रासारख्या मानव्यविद्येत तरी! यामुळे अवतरणे, असंबंधित तपशील, वर्णने यांची खेचाखेच वा भाऊगर्दी आपल्या संशोधनात झाली असल्याचे मोठ्या प्रमाणावर आढळते. माहिती म्हणजे ज्ञान नव्हे आणि उपपत्तीशिवाय माहितीचे ज्ञानात रूपांतर होऊ शकत नाही. औपपत्तिक बाजूकडे दुर्लक्ष केल्याचे परिणाम यापुढे फार तीव्रपणे जाणवतील कारण जनतासंपर्क-माध्यमे आणि ध्वनिमुद्रण इत्यादि क्रियांसाठी उपलब्ध होणारी साधने इत्यादींमुळे माहितीचा धबधबा वाहू लागेल. या माहितीपुढे टिकाव लागावयाचा तर उपपत्ती उभ्या करणारे संशोधकीं मन हवे.

लोकसाहित्याच्या अभ्यासकात संशोधकी बाणा कमी का हा प्रश्न विचारल्यावर एक वेधक गोष्ट ध्यानात येते. ती अशी की ऐतिहासिक विकासक्रमामुळे लोकसाहित्यशास्त्रज्ञांनी अनेक वळणे स्वीकारली ती सर्व संशोधनाच्या आजच्या टप्प्यावर आपण स्वीकारली पाहिजेत असे नाही. या महत्त्वाच्या मुद्याचा आपल्याला विसर पडतो. म्हणजे असे की या शास्त्रास आकार देणाऱ्या पाश्चात्यांच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीमुळे किंवा त्यांच्या वैयक्तिक पात्रापात्रतेमुळे त्यांनी एखादे वळण जरी प्रभावीपणे गिरवले असले तरी शास्त्राच्या विकासाच्या वर्तमान टप्प्यावर त्या विशिष्ट वळणाचे महत्त्व केवळ ऐतिहासिक ठरू शकते याचे आपल्याला भान राहत नाही. उदाहरणार्थ वंशशास्त्रीय वा समाजशास्त्रीय वळणे पहा. या वळणांमुळे सर्व तपशील नोंदणे याला महत्त्व आले, त्याचप्रमाणे

©DR ASHOK DA RANADE MEMORIAL TRUST 

कोणता तपशील महत्त्वाचा याचेही काही वंशशास्त्रीय इ. निकष ठरले. पण आज या गोष्टी सयुक्तिक आहेत का? याच वळणामुळे घोटाळा असा झाला की तपशीलाचे स्पष्टीकरण दिले की त्यामुळे संबंधित गोष्ट अर्थपूर्णही ठरते असे मानण्याकडे कल राहू लागला. स्पष्टीकरण देणे म्हणजे एखाद्या तपशीलाचे, तथ्याचे वा घटनेचे घटक कोणते, त्यांच्या कार्याचा क्रम काय इत्यादी नोंदवून एक कारणपरंपरा मांडणे होय. या उलट, अर्थपूर्णता सिद्ध करणे म्हणजे एक मूल्यसंबद्ध निर्णय घ्यावयाचा तर तथ्यांची आपण लावलेली संगती वंशशास्त्रांच्या परिसरात राहून चालणार नाही. तिला संस्कृतिशास्त्रांत नेऊन बसवायला हवे. रूढ संज्ञांची व्युत्पत्ती, आज वापरात असलेल्या पण बोधक नसलेल्या संकेतांमागची प्रतीकात्मता वा या प्रतीकांची प्राचीनता इत्यादि बाबींचे अभ्यासपूर्ण विवरण करूनही लोकसाहित्याचा संस्कृतिशास्त्रात रिघाव होणार नाही. यासाठी एक वेगळा मूल्यनिर्णय करावा लागतो.

वेगळ्या प्रकारचा हा मूल्यनिर्णय कसा करता येईल? यासाठी ज्यांचा वैचारिक गाभा मूल्यात्म असतो अशा तीन शास्त्रांकडे वळले पाहिजे. ती म्हणजे तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र आणि सौंदर्यमीमांसा ही होत. तपशीलाच्या अरण्यामागे धावता धावता शास्त्रीय सत्याचे झाड दिसू नये ही दुरवस्था टाळावयाची तर संकल्पनांच्या पातळीवरचे पक्के निर्णय स्पष्टपणे घ्यावे लागतात आणि लोकसाहित्यशास्त्राच्या अभ्यासात हे निर्णय संकल्पनांबाबत घेणे भाग आहे. त्या संकल्पना वरील तीन अभ्यासक्षेत्रांमधल्या असतात. उदाहरणार्थ, असंख्य सुट्या तपशीलांमागचे तत्त्व जाणावयाचे तर तत्त्वज्ञानाची कास धरली पाहिजे. लोकसाहित्यात दिसणारा मानवप्राणी शिवेतराचा आग्रह धरणारा असू शकतो. याचा बोध नीतिशास्त्रीय विचारधारेची सोबत ठेवल्यामुळे शक्य होतो. आणि अनेकदा कारागिरी व कलामूल्यात्म प्रेरणा प्रबळ दुर्बळ ठरल्यामुळे लोकसाहित्याची विशिष्ट रूपे सिद्ध होत असतात, असा उलगडा सौंदर्यमीमांसेच्या जवळीकेमुळे होत जातो. वरील तिन्ही शास्त्रे मूल्यविचारावर जोर देत असतात. लोकसाहित्यासारख्या जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणाऱ्या अभ्यासक्षेत्रास मूल्यनिरपेक्ष संशोधनाचा दावा करणे कसे शक्य आहे? आणि आणखी थोडे कसोशीने बोलावयाचे तर असेही म्हणता येईल की लोकसाहित्याचे प्रमुख अभ्यासविभाग चार मानले तर त्यातल्या तीन विभागात कारागिरी आणि कलात्मता यांचा वाटा मोठा असतो आणि त्यात पुन्हा दोहोंत प्रयोगात्मता प्रभावी असते. मौखिक परंपरा, भौतिक संस्कृती आणि प्रयोगकलाविष्कार या तीन भागांत कारागिरी आणि कलात्मता याचा मोठा वाटा राहतो आणि पैकी मौखिक परंपरा आणि प्रयोगकला या दोहोंत प्रयोगात्मता अंमल गाजवीत असते. म्हणजे मूल्यात्मतेकडे संशोधकांचे लक्ष असावे याचबरोबर कलामूल्य बरेच महत्त्वाचे असते, आणि कलामूल्यात प्रयोगमूल्याची ताकद नीट ओळखावी अशी सूत्रे नोंदवावी लागतात. आतापर्यंत महाराष्ट्रात झालेल्या संशोधनामागे या कारणपरंपरेची जाणीव आहे असे दिसत नाही. परिणामत: संकलनसुद्धा सर्वांगीण झालेले नाही - या संकलनावर आधारित संशोधनही एकांगीपणाच्या दोषाने डागळले गेले तर नवल नाही! संशोधनाचा पाया भुसभुशीत भुईवर घातला गेला कारण मुळाशी बराचसा सांकल्पनिक गोंधळ राहिला. लोकसाहित्यशास्त्री मानतात त्यापेक्षा बऱ्याच अधिक प्रमाणात कारागिरी-कलात्मता-प्रयोगात्मता यांचा वावर एकंदर लोकसाहित्यात होत असतो. कारण निम्म्याहून अधिक लोकसाहित्य 'सादर' होत असते. अशी परिस्थिती असूनही आपला विचार साहित्यिक अंगाने वा भाषिक अंगाने चालू ठेवण्यातच लोकसाहित्यशास्त्री मग्न कसे राहू शकतात याचे आश्चर्य वाटल्याखेरीज राहत नाही.